# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/04/2023 (शनिवार) दुपार

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा अंबोला शिवार येथे दिनांक १३/०४/२०२३ चे ०७/३० वा. पुर्वी **आरोपी नामे — प्रविण अशोक हिरूडकर, वय ३२ वर्ष, रा. अंबोला ता. नरखेड** याचे मृतकची आई जयश्री रामकृष्ण खोडे हीचे सोबत प्रेम संबंध असल्याने **मृतक नामे — शुभम रामकृष्ण खोडे, वय २४ वर्ष** हा तिचेशी वारंवार भांडण करीत असल्याचे कारणावरून आरोपी नामे — प्रविण अशोक हिरूडकर याने मृतक शुभम रामकृष्ण खोडे याचा दुपट्टयाने गळा आवळुन त्यास जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पो.नि जयपालसिह गिरासे, ८४१९९४११८८ हे करीत आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

१) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०७ किमी अंतरावर मौजा लोहारा आरोपी क्रिष्णा तुळणकर याचे घरी येथे दिनांक १४/४/२०२३ चे १७.३० वा. ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सुहाग बंडुजी डोईफोडे, वय २७ वर्ष रा. लोहारा ता. उमरेड जि. नागपुर याचा चुलत भाऊ जखमी नामे— सुरज उत्तम डोईफोडे व **आरोपी नामे— क्रिष्णा श्रीराम तुळनकर वय २९ वर्ष रा. लोहारा** यांचा दि. १४/०४/२०२३ चे १७/३० सुमारास आपसात झगडा भांडण दरम्यान जखमी सुरज याने आरोपी क्रिष्णा याची टिशर्ट फाडली होती तेव्हा आरोपी याने जखमीस ''तु घराकडे ये तुला बघतो'' अशी धमकी दिली व निघुन गेला काही वेळाने जखमी हा हातात काठी घेवुन आरोपीच्या घराकडे गेला त्यानंतर आरोपी यास जखमी याची जात महार असल्याचे माहीत असुन त्याने त्याचे घरात जखमी यास काठीने डोक्यावर व हातावर मारून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, भादंवि ३ (२) व्ही. ए. अ. जा. ज. प्रति. सुधारीत कायदा २०१५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भिमराव टेळे उमरेड विभाग मो. क्र. ९९२३३८८७६६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर